Impact Factor – 6.625 | Special Issue - 325 | June 2023 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# India@75

75 Azadi Ka Amrit Mahotsav

- GUEST EDITOR -

**Dr. O. J. Rasal**

**Mr. S. S. Patel**

- CHIEF EDITOR -

**Dr. Dhanraj T. Dhangar**

- EXECUTIVE EDITORS -

**Mr. H. S. Shaikh**

**Mr. C. M. Gangawane**

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : Academic Book Publications

37. मानव विकास निर्देशांक आणि भारत ........ 152
अर्चना रामनाथ कानवडे, प्रा.डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे

38. स्थानीय सरकार के गठन और तांतमुक्ति ग्राम अभियान का संबंध ........ 155
बाळासाहेब भानुदास खरात, डॉ. पापली राम

39. मार्क्सचे धर्मविषयक विचार ........ 159
सोपान बाळासाहेब नवथर

40. हिंदी सिनेमा और पटकथा लेखन ........ 161
श्रीकांत भाऊसाहेब शिंदे

41. मराठी साहित्यातील वास्तववादी साहित्यप्रवाहः दलित साहित्य ........ 163
सुधीर किसनराव त्रिभुवन

42. खेडे 75 ........ 166
प्राचार्य हितेंद्र रामरावजी आहेर आणि सहा. प्रा.जयवंत रामदास भदाणे

43. वारकरी कीर्तन संकल्पना स्वरूप ........ 168
प्रा राहुल अशोक भाकरे

44. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीयांची परिवर्तनशील कविता ........ 170
प्रा. ज्योती आनंदराव दिघे

45. हिंदी साहित्य और सिनेमा ........ 172
प्रा. गोरख भोरू इदे

46. महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचाराची सद्यस्थितीतील उपयुक्तता ........ 174
प्रा. महेश शिवाजीराव जाधव

47. आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे बदलते प्रवाह ........ 176
रामदास पंढरीनाथ कातकडे

48. भारतातील टपाल खात्यातील स्थित्यंतरे : काल आणि आज ........ 179
माधवी अशोक मोरे-पिसाळ

49. धूळपावलं कादंबरीतील समाजजीवन ........ 181
प्रा. सुरेश लक्ष्मण नजन

50. शांता शेळके यांचे मराठी माणसाच्या ह्दयातील मराठी गीते ........ 183
प्रा. स्मिता मुरलीधर पालेकर (शहाणे)

51. भारताचे परराष्ट्र धोरण आणि संबंध ........ 189
प्रा. मोहन भानुदास परतवाघ

52. गांधी युगातील स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे योगदान ........ 193
प्रा. शाहुराव पवार

53. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरवी : जात वास्तव आणि ‘फँड्री’ ........ 198
प्रा. स्वप्निल भारत रणखांबे

54. आर्थिक विकासात परकीय गुंतवणूकीचे महत्त्व ........ 202
डॉ. एस. बी. पाते, मनिषा किसन सानप

55. सिनेमा और फिल्मांतरण ........ 205
केशव काकासाहेब ससे

56. भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्ष: एक अवलोकन ........ 207
रवी सुभाषराव सातभाई

57. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा एक अभ्यास ........ 210
प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके

58. भारताचे परराष्ट्र धोरणाचे तत्त्वे आणि उद्दिष्टे ........ 212
गणेश शेषराव शेळके

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 325 : India@75
ISSN : 2348-7143
June 2023

# भारतातील टपाल खात्यातील स्थित्यंतरे : काल आणि आज

**माधवी अशोक मोरे-पिसाळ**
पीएमटीचे आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव.

**गोषवारा:** *भारतीय टपाल खात्याला १६१ वर्षापेक्षा अधिक काळ होऊन गेला. भारतीय टपाल खात्याला आजही जनसामान्यांच्या मनात तेवढेच महत्वाचे स्थान आहे. भारतीय टपालखाते नात्यांची वीण जपणारा विभाग आहे. खेड्यांपासून शहरापर्यंत आजही पोस्टावर नितांत विश्वास असलेली गर्दी टपाल कार्यालयामध्ये दिसते. प्रत्येक भारतीय माणसाने पत्रासोबत केलेला प्रवास हा अनुभवलेला आहे. आधुनिक काळात संपर्काची साधने ही बदलत गेली. मेसेज, ई-मेल, व्हॉट्सॲप, फेसबुक इत्यादी पर्यंत हा बदल होत गेला. आज टपाल खाते टपाल सेवेव्यतिरिक्त बँकिंग, विमा, आर्थिक व्यवहारासाठीचे माध्यम झाले आहे.*

**प्रस्तावना :**

भारतात राजे-महाराजांनी संदेश पाठविण्यासाठी कबुतरांचा वापर केला. संस्थांनाची स्वतःची अशी संदेश पोहोचविण्याची यंत्रणा होती. भारतामध्ये आधुनिक टपाल यंत्रणेची सुरुवात १ ऑक्टोबर १८४५ मध्ये झाली. भारतीय टपाल सेवा ही भारतातील मध्यवर्ती सरकारच्या टपाल खात्यामार्फत 'इंडिया पोस्ट' या नावाने चालविली जाते. देशभरात १ लाख ५५ हजार ३३ कार्यालयांमार्फत चालणारा इंडिया पोस्टचा कारभार हा जगातील या स्वरुपाचा सर्वात मोठे जाळे आहे. देशाच्या दूरवरच्या आणि पोहोचायला अत्यंत अवघड भागातही टपाल सेवेच्या सेवा पोहोचल्या जातात. सध्याच्या टपाल व्यवस्थेची सुरुवात सतराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झाली. १६८८ मध्ये मुंबई आणि मद्रास येथे कंपनी पोस्टची कार्यालये स्थापन झाली. परंतु त्याद्वारे केवळ कंपनीच्या टपालाचीच ने-आण होई. वॉरन हेस्टिंज हा बंगाल प्रांताचा गव्हर्नर असतांना त्याच्याकडे मुंबई व मद्रास ह्या भागाचे देखरेखीचे अधिकार होते. सन १७७४ मध्ये टपालसेवा जनतेसाठी खुली करण्यात आली. टपाल सेवेसाठी पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकन टपालासोबत वापरायला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळातील अडचणीवर मात करण्यासाठी सर्व प्रेसीडेन्सी अंतर्गत टपाल सेवा यामध्ये एकसुत्रीपणा असावा असा विचार पुढे झाला. यामधुनच पहिला भारतीय टपाल कायदा १८३७ अस्तित्वात आला.

**किवर्ड :**पोस्ट ऑफिस, अल्पबचत योजना, टपाल.

**उद्दिष्टे :**

१. भारतीय टपाल खात्याचा अभ्यास करणे.
२. पोस्ट ऑफिसच्या आधुनिक सेवांचा मागोवा घेणे.
३. पोस्ट खात्याच्या वित्तीय योजनांचा अभ्यास करणे.

**पोस्ट ऑफिस माहिती**

| घटक | माहिती |
|---|---|
| मुख्यालय | नवी दिल्ली |
| संस्थापक | भारत सरकार |
| स्थापना | १ ऑक्टोबर १८५४ |
| अधिकारक्षेत्र | भारत |
| सहाय्यक | इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक |
| कर्मचारी | ४१६, ०६३ (मार्च २०२१) |
| वार्षिक बजेट | रु.२०,८२०.०२ कोटी (US २.६ अब्ज २०२२-२३) |
| संकेतस्थळ | www.indiapost.gov.in |

Source : www.indiapost.gov.in

पोस्ट ऑफिसमध्ये वेगवेगळ्या स्वरुपाच्या सेवा दिल्या जातात. जसे मेल, मनीऑर्डर द्वारे पैसे पाठविणे, लहान बचत योजना अंतर्गत ठेवी, पोस्टल लाईफ इन्शुरन्स (पी एल आय) आणि ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स (आर पी एल आय) अंतर्गत जीवन विमा संरक्षण प्रदान करणे, बील संकलन यासारख्या किरकोळ सेवा प्रदान केल्या जातात. नागरिकांसाठी इतर सेवा जसे वृद्धापकाळात निवृत्ती वेतन आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना वेतन वितरणासाठी भारत सरकारकडून एजंट म्हणून काम करते.

२३ पोस्टल मंडळामध्ये संपूर्ण देशाची विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक मंडळाचे प्रमुख पोस्टमास्टर जनरल करतात. प्रत्येक विभागामध्ये विभागले गेले आहे. ज्याचे प्रमुख पोस्ट मास्टर जनरल करतात. हे विभाग पुढे उपविभागांमध्ये विभागले गेले आहेत. २३ मंडळाव्यतिरिक्त भारताच्या सशस्त्र दलांना पोस्टल सेवा प्रदान करण्यासाठी एक बेस सर्कल आहे ज्याचे प्रमुख महासंचालक आहेत.

**भारतीय टपाल सेवेचा इतिहास:**

पत्र घेऊन जाणारे हरकारे, घोडेस्वार, उंटस्वार, त्यानंतर पत्रांची चळत घेऊन जाणाऱ्या बैलगाड्या, जहाजे, रेल्वे, असा अत्यंत रोमांचकारी या प्रवासांमध्ये उलगडली. पोस्टमन जवळ असलेल्या चामड्याच्या पिशव्या, त्यांचे बिल्ले, लाल-हिरव्या टपालपेट्या असा भावनिक पैलुही भारतीयांच्या आठवणीत आहे. नागरिकांच्या दारापर्यंत टपालसेवा पुरविणारी भारतीय टपालसेवा ही जगभरातील एकमेव सेवा आहे. ई-मेलच्या काळातही आज पोस्टमन ग्रामीण भागातील नागरिकांना थेट नावाने ओळखतात. गुणवत्तेबाबत थोडी चिडचिड, काही प्रश्न, अडचणी निर्माण होत असल्या तरी टपाल सेवेचा कारभार आणि हा कारभार चालविणारी माणसे यांनी देशातील विविध गावखेड्यापर्यंतचे जाणेयेणे गुंतुन सांभाळून ठेवले आहे. ई-मेलच्या काळातही टपालसेवेचा वापर होतो. विमा कंपन्यांच्या पावत्यांपासून ते

नोटीसपर्यंत टपाल खात्यावरच विसंबून रहावे लागते.

भारतीय टपाल खातेची सुरुवात ही १ ऑक्टोबर १८५४ रोजी झाली. सुरुवातीला ऑफिस संदर्भातील सर्वाधिकार हे सरकारला होते. १८५४ ह्याच वर्षी रेल्वे डाक सेवा सुरु झाली. याच वर्षी भारतीय टपाल खात्याचे पहिले टपाल तिकिट सुरु झाले. मुंबईच्या जनरल पोस्ट ऑफिसची स्थापना सन १७९४ मध्ये झाली. मुंबई प्रांतासाठी ईस्टइंडिया कंपनीने हे कार्यालय स्थापन केले. देशस्तरावर टपालखाते १ लाख ५० हजाराहून अधिक पोस्टऑफिस कार्यालये आहेत. यापैकी १ लाख ३९ हजार पोस्ट ऑफिस ग्रामीण भागात आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा म्हणजे १९४७ ला २३ हजार ३४४ एवढी पोस्ट ऑफिस सेवा ही प्रामुख्याने शहरीभागातून होती. स्वातंत्र्यानंतर पोस्ट ऑफिसेसच्या संरचनेमध्ये ७ पटीने वाढ झाली आहे.

एक पोस्ट ऑफिस साधारणपणे २१.४६ चौरस किलोमीटर भागासाठी कार्यरत आहे. ७ हजार ७५३ लोकसंख्येला सेवा दिली जाते असे समीकरण आहे. पूर्ण देशात टपाल खात्याची विभागणी २३ भागांमध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्र सर्कलचा विचार करताना महाराष्ट्र आणि गोवा ह्या दोन्ही राज्याचा समावेश झालेला आहे. महाराष्ट्रात ५ विभाग आणि १ शाखा आहे. टपाल खात्याने महिलांना दिलेल्या समान संधीचा विचार करता आज महाराष्ट्रात फक्त महिलांच्या माध्यमातून कार्यरत पाच कार्यालये आहे. मुंबईत टाऊन हॉल येथील कार्यालयाचा कारभार केवळ महिला चालवतात.

**पोस्ट ऑफिस प्रदान करत असलेल्या आधुनिक सेवा सुविधाः**

पोस्ट ऑफिसकडून देण्यात येणाऱ्या आधुनिक सेवा यामध्ये कोअर बँकिंग सुविधा दिली जाते. तसेच एटीएम, ई-बँकिंग, मोबाईल बँकिंग, जन सुरक्षा योजना, राष्ट्रीय पेन्शन प्रणाली यासारख्या सुविधा दिल्या जातात.

**पोस्ट ऑफिस वित्तीय सेवाः**

सन १८८२ पासून पोस्ट ऑफिस बचत बँक देशातील विविध भागात पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून ही सुविधा पुरवित आहे. वित्त मंत्रालय भारत सरकारच्या वतीने पोस्ट ऑफिस बचत बँक योजना संचलन करते. देशातील १.५७ लाख पोस्ट ऑफिस कार्यालयाच्या माध्यमातून पोस्ट बचत बँक सुविधा दिली जाते.

**पोस्ट ऑफिसच्या अल्पबचत योजनाः**

पोस्ट ऑफिसने लोकांना बचतीची सवय लावली. नागरिकांना उच्च व्याजदरांचा लाभ घेता येतो. आयकर कायद्याच्या कलम ८०C अंतर्गत कर भरण्यापासून सूट मिळते. पोस्ट ऑफिस आपल्या ग्राहकाला लहान बचत योजनांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी देत असते. या योजना सुरक्षित चांगल्या आणि हमी परताव्यासाठी प्रसिद्ध आहे. या ठेव योजनांचा व्याजपट दर तीन महिन्यांना सरकार ठरवते.

खालील प्रकारच्या बचत योजना आहे.

१. पोस्ट ऑफिस बचत खाते.
२. पोस्ट ऑफिस मासिक उत्पन्न योजना
३. सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी
४. जेष्ठ नागरिक बचत योजना
५. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र
६. पोस्ट ऑफिस आवर्ती ठेव योजना
७. किसान विकास पत्र
८. सुकन्या समृद्धी योजना
९. पोस्ट ऑफिसची टाइम डिपॉजिट योजना

**पोस्ट ऑफिस बचत योजना व्याजदरः**

| योजना | व्याजदर (%) | चक्रवाढ व्याज मोजणी |
|---|---|---|
| बचत खाते | ४ | वार्षिक |
| १ वर्षे मुदत ठेव | ६.८ | तिमाही |
| २ वर्षे मुदत ठेव | ६.९ | तिमाही |
| ३ वर्षे मुदत ठेव | ७ | तिमाही |
| ५ वर्षे मुदत ठेव | ७.५ | तिमाही |
| ५ वर्षे आवर्ती ठेव | ५.८ | तिमाही |
| ५ वर्षे जेष्ठ नागरिक बचत योजना | ८.२ | तिमाही |
| ५ वर्षे मासिक उत्पन्न खाते | ७.४ | मासिक |
| ५ वर्षाचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र | ७.७ | वार्षिक |
| सार्वजनिक भविष्य निधी | ७.१ | वार्षिक |
| किसान विकास पत्र | ७.५ | वार्षिक |
| सुकन्या समृद्धी योजना | ८ | वार्षिक |

वरील तक्त्यात पोस्ट ऑफिसचे विविध अल्पबचत योजनांचे व्याजदर स्पष्ट करण्यात आले.

**निष्कर्षः**

पारंपारिक टपाल पोहोच करणे या कामापासून झालेली सुरवात ते आज कोअर बँकिंग पर्यंत झालेला प्रवास हा टपाल खात्याने अनुभवला आहे. पोस्ट ऑफिसमध्ये संगणकाचा वापर हा केला जाऊ लागला. सर्व पोस्ट ऑफिस हे संगणक प्रणालीद्वारे जोडण्यात आली. पोस्ट ऑफिस कार्यालयाचे स्वरुप बदलते दिसून येते. पूर्वी पेक्षा आताची पोस्ट ऑफिसेस ही चांगल्या फर्निचर, संगणक, सर्व सोयी सुविधानुरुप असलेली आढळतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या काळात संपर्काच्या साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. परंतु टपाल हे माध्यम हे कधीही न विसरणारे आहे. त्याला आपण तंत्रज्ञानाच्या जोडीने आधुनिक माध्यम बनवू शकतो आणि त्याचीच सध्या गरज आहे.

**संदर्भ :**

१. सदानंद शिनगारे, जुन २०१४ भारतीय डाक-पत्रांचा इतिहास
२. ओमप्रकाश शानवी, भारतीय डाक-सदियोंका सफरनामा
३. Wikipedia-http://mr.m.wikipedia.org
४. India Post - https://www.indiapost.gov.in
५. भारतातील टपाल सेवेची व्याप्ती –https://loksatta.com
६. https://marathidigital.com

●●●

# धूळपावलं कादंबरीतील समाजजीवन

प्रा. सुरेश लक्ष्मण नजन
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्टस् कॉमर्स सायन्स कॉलेज, शेवगाव.

*धूळपावलं ही महेंद्र कदम यांची २००९ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. वर्तमान जीवन त्याचबरोबर गावातील राजकारणासह कादंबरीचे कथानक उलगडत जाते. कादंबरीच्या सुरुवातीलाच ऊसतोड प्रसंग आलेला आहे. आबांच्या ऊसाला तोड येत नाही. जे सभासद नाही अशा लोकांचा ऊस तोडून जातो, पण आबाच्या ऊसाचा नंबर येत नाही, ऊसाला तोड येत नाही. जानेवारीतले ऊस तोडले पण आबाचा अकराव्यातला ऊस तसाच उभा आहे तेव्हा आबा आणि स्लिपमास्तर ची खरखर होते ''जानेवारीतलं फड फुटलं तरी आमचा आकराव्यातला तसाच....आमी पडलो नौकर, तुमी चेअरमनसायबांची चिठी आणा. लगीच तोडचिठी देतो. ती तुमी नगा आमाला सांगू सायेब. हुवून हुवून काय हुईल ऊस वाळूनच जाईल तुमी नाय नेला तर...आमी त्याज सर्पान करू''[१] यावरून एका शेतकऱ्याची तळमळ दिसून येते.*

गावात ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होतो. गावात तीन पार्टी, तीन वार्ड व नऊ मेंबर असे समीकरण चालू असते. सरपंच पद हे मागासवर्गीय बाईला आरक्षण जाहीर झालेले असते. त्यामुळे आबा नवीन पिढीला निवडणुकीला उभे करायचे ठरवतात. पार्टीतील लोक बाराव्या ठोक्याला विकास व रावसाहेबांची नावं फिक्स करतात. पंडीतराव कारखान्याचे संचालक असतात ते पण त्यांच्या पार्टीचे नियोजन करतात. गायकवाड मास्तरांची मालकीण पंडीतराव फिक्स करतात. निवडणुकीत आबा बाजी मारतात. सरपंचपद रामभाऊच्या गटातील सौ.भागाबाई खंडागळे यांना तर उपसरपंच पद रावसाहेबांना करण्यात आबा आपला हेतू साध्य करतात. धनूच्या विसाव्याच आणखी एक ठिकाण म्हणजे गावातल्या चौकातील आडाचा कट्टा. गावामध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. परवाच्या ग्रामसभेत ग्रामपंचायतने ठराव करून पिण्याच्या पाण्यासाठी रमेशचा बोअर ताब्यात घेतला. पण सत्ता गेल्याने रमेशने वेगळीच गेम केली. सायबाला पैसे देऊन पाणी पिण्यास अयोग्य असा रिपोर्ट आणला आणि पंचायतीच्या ऑफिसात जमा केला. गण्या, पिण्या, रमेश, धनु, यांच्या गावातल्या गप्पा, कामवाल्या बायांच्या गोष्टीआडाच्या कट्ट्यावर बसून चाललेल्या असतात.

गावामध्ये पाण्याची मारामार व दुष्काळ पडलेला असल्यामुळे तात्या आणि धनु बैल सोडून देतात. पण बैल परत घराच्या दिशेने येतात. धनु आणि डोंगरे सरांची चर्चा होते ''सध्या दुष्काळ वाचतोय सर, खरं म्हणजे दुष्काळातली परिस्थिती आणि होरपळून निघालेली माणसं पाहायला, अनुभवायला मिळतात हे काय थोडं आहे सर? जगण्याला भिडावं तर लागणारच धनंजय, तिथून पळणं म्हणजे आत्महत्याच आहे एका प्रकारची. वास्तवाचं भान ठेवायलाच हवं रे बाबा! दुष्काळ काय तुझ्या माझ्या हातात आहे का''[२] जीवनात आलेल्या परिस्थितीना सामोरे तर जावेच लागणार ना. दुष्काळातील अडचणीतून पळ काढणे म्हणजे एक प्रकारची आत्महत्याच आहे. दुष्काळ काय कोणाच्या हातात आहे का? या सर्व गोष्टीतून दुष्काळी परिस्थितीतून होरपळून निघालेला गाव तेथील धनुसारखे इतर गावातील लोक यांना या परिस्थितीत तरुणांना धीर देणे गरजेचे आहे अशी चर्चा त्या दोघांमध्ये होते. फकीरला लाखाची लॉटरी लागूनही त्यांचे पाय जमिनीवर आहे हे पाहून धनूला समाधान वाटले. रामभाऊ आपले वर्चस्व, दबदबा कमी होत आहे त्यामुळे 'एक घाव दोन तुकडं' करण्याचा डाव रचतात. गावात रोजगार हमीची काम सुरू असतात. निवेदनामध्ये कामाची निकृष्टता, भ्रष्टाचार वगैरे गोष्टी घालून सह्या अंगठे घेऊन निवेदन देतात. चौकशी पूर्ण झाल्याशिवाय काम सुरू करू नये असे तहसीलदाराचे पत्र ग्रामपंचायतीला येते. गावातील रोजगार हमीचे काम बंद पडते.

धनुने पत्रकारितेची पदवी मिळवलेली असते. त्याला अनुभव नाही म्हणून काम मिळत नाही. जून महिन्यात एम.ए.ला बहिस्थ विद्यार्थी म्हणून तो प्रवेश घेतो, बाकीची कामे करता करता महिनाभर खपून धनू शेतकऱ्यांच्या एकूण स्थिती-गतीचा विचार करून अनेक संदर्भ गोळा करून, आत्महत्यांचा आढावा घेऊन लेख तयार करतो. ''विशेष लेख या सदराखाली शेतकऱ्यांच्या आत्महत्येला निष्क्रीय शासन जबाबदार: धनंजय शेळके असा मजकूर बघून तो हरकून जातो''[३] त्यांनतर एक दिवस दैनिक समन्वयची स्वतंत्र जिल्हा आवृत्ती सुरू होते. त्या दैनिकासाठी वार्ताहर, उपसंपादक हवे असल्याची जाहिरात धनु वाचतो व सरळमार्गाने अर्ज करतो. सुरुवातीचे काही दिवस वार्ताहर म्हणून काम करण्याची संधी त्याला मिळते.

रोजगार हमीची बंद पडलेली कामे गावात चालू होत नाहीत. रामभाऊ अर्ज मागे घेत नाही. त्यामुळे धनु, रमेश, पांडबा माहितीच्या अधिकाराचा अर्ज दाखल करतात. त्यानंतर धनु पेपरमध्ये बातमी देतो. ''रोहयोच्या कामात घोटाळा, गाव आंदोलनाच्या तयारीत' त्यातून योग्य तो परिणाम होतो. गावातील कामे आठ दिवसात सुरू होतात. धनु पत्रकार म्हणून परिचित होतो. जलस्वराज्य मोहिमेतील प्रकल्पात गावाचा समावेश झाला. नवीन पाणीयोजना, रस्ते मंजूर झाले. नळ योजनेबरोबर वस्त्यांवर हापसे कोठे द्यायचे यावरून सरपंच-उपसरपंच यांच्यात वाद होतात. 'सरपंच-उपसरपंचाच्या मतभेदांमुळे ग्रामस्थ पाण्यापासून वंचित' या बातमीमुळे धनूच्या निर्भिडपणाची चर्चा गावात सुरू होते.''[४] बळीराजा वाचनालय नावाने गावात वाचनालय सुरू होते. धनुने गावात व्याख्यानमाला सुरू केली. विकास आणि त्यांच्या जोडीदारावर अट्रासिटीचा गुन्हा सरपंच दाखल करते. गावातले वातावरण चिघळते. सरपंचावर अविश्वास ठराव पडतो. निवडणूक निर्णय अधिकारी तो ठराव बहुमत घेऊन मंजूर करतात. पुढच्या तारखेला तक्रार मागे घेऊन विकास शिंदेसह सर्वांची निर्दोष सुटका होते.

वाचनालयात पुस्तकांची संख्या भरपूर असल्याने व जावक नोंदीही मुबलक असल्यामुळे शासनाची समिती वाचनालयाच्या अनुदानासाठी शिफारस करते. धनु सहकाऱ्यांच्या मदतीने गावात महात्मा फुलेंच्या नावाने व्याख्यानमाला सुरू करतात. व्याख्यानमालेसोबत आपण दरवर्षी एका प्रयोगशील शेतकऱ्याला ''महात्मा फुले कृषिभूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्याचे ठरवतात. त्यात पहिला पुरस्कार विकास शिंदेला देण्यात येतो.''[५] गावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरू होते. बंदिस्त गटारी, रुंद रस्ते, कचराकुंड्या, वृक्षारोपण, गावात एक भव्य शॉपिंग सेंटर इ. सुधारणा होतात. इतिहासाचे तज्ञ वक्ते बोलावून गावात शिवजयंती निमित्ताने व्याख्यान आयोजित केले जाते. शॉपिंग सेंटरचे उदघाटन अंतर्गत संघर्षामुळे रखडले जाते त्याची बातमी धनू पेपरला देतो व ती छापुन येते. ''घराणेशाहीच्या अंतर्गत संघर्षामुळे व्यावसायिकांवर गदा''[६] या बातमीमुळे गावभर चर्चा होते. विरोधक त्या दोघांना शिव्या, खुन्नस देतात. एका रात्री गावाजवळच्या ओढ्यात सात-आठ जण त्या दोघांना काठीने मारून ते धूळरक्ताने माखून जातात.

एकंदरीत पारंपारिक विचारात असलेले गावातील राजकारणी, ग्रामपंचायत पदासाठी, सत्तेसाठी चाललेली धडपड, सत्तासंघर्ष एकीकडे तर दुष्काळ, गावातील पाण्याची समस्या, जनावरांचे हाल त्यातुन रोजगार हमीची कामे, जनावरांसाठी चारा छावणी, छावणीतील भ्रष्टाचार इ. गोष्टी गावात घडत असतात. नव्या विचाराचा धनु शेळके गावात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करतो, त्यामध्ये विकास शिंदे गावाच्या विकासासाठी झटत असतो. कोणत्याही गावात घडणारी ही कथा, गाव घडावा, शिवार हिरवं होताना माणसे दळदार व्हावीत, दिलदार शत्रुत्व सांभाळत राजकारण समृद्ध व्हावे, गावाच्या तटबंदी कोसळून सारा गाव वेशीच्या आत नांदावा, अशा स्वप्नांनी वावरत आपली धुळपावलं अधिक मजबूत करू पाहणाऱ्या तरुणांची ही कादंबरी आहे. धनु शेळकेच्या डोळ्यांनी गाव पाहात नवी पावले उमटावीत. कादंबरीची भापाशैली संवादी बोली रूपातील आहे. कादंबरीतील घटना-प्रसंग ताकदीने उभे राहतात. प्रभावी लेखनशैली असल्यामुळे कथानक मनाची पकड घेते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बी.ए. भाग एकच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झालेली ही कादंबरी २००९ मध्ये शब्दालय प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित झाली. एका तपानंतर 'धूळपावलं' अभ्यासक्रमात समाविष्ट झाली आहे.

**संदर्भ :**

१. महेंद्र कदम, धुळपावलं, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २००९ पृ.क्र. ०५
२. उनि पृ.क्र.३५
३. उनि पृ.क्र. ७०
४. उनि पृ.क्र. ९९
५. उनि पृ. क्र. १३८
६. उनि पृ. क्र. १५५

●●●

Organized by

Pravara Medical Trust's,

## Arts, Commerce & Science College,

Shevgaon, Dist. Ahmednagar, (M.S.) India



**Publisher & Printer**

## Academic Book Publications

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,
Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.
**Ph.:** (0257) 2235520, 2232800. **Mob.:** 93092 60560

**E-mail : academicbooksjalgaon@gmail.com**

**Price : ₹ 1000/-**